महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०३ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

### ३ ते २३ नोव्हेंबर कालावधीत

# डांबरीकरणासाठी शहाड पूल राहणार बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** कल्याण-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचा असलेला शहाड पूल पुन्हा येत्या ३ नोव्हेंबरपासून ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत डांबरीकरणासाठी पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वतीने हे काम हाती घेणार असून, या काळात पुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद राहणार आहे. यापूर्वी २८ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबरपर्यंत हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. यावेळी पुलाची डागडुजी करण्यात आली होती. मात्र पुलावरील परिस्थिती जैसे थे असल्याची वाहनचालकांकडून तक्रार केली जात होती. आता डांबरीकरणाचे काम होणार असल्याने पुन्हा २० दिवस वाहनचालकांसाठी कोंडीचे ठरणार आहेत. उल्हासनगर वाहतूक उपविभागाच्या हद्दीत येणाऱ्या या कामामुळे परिसरात मोठ्या



प्रमाणावर वाहतूक कोंडीची शक्यता असल्याने ठाणे वाहतूक विभागाने पर्यायी मार्गांची व्यवस्था केली आहे. वाहतूक पोलीस उपआयुक्त पंकज शिरसाट यांनी मोटार वाहन कायद्यानुसार याबाबतची अधिसूचना जारी करून वाहनचालकांना माहिती दिली आहे.

प्रवेश बंद आणि पर्यायी मार्ग कसे असतील याबाबत वाहतूक पोलिसांच्या वतीने माहिती देण्यात आली आहे. यात अहिल्यानगरकडून माळशेजमार्गे कल्याणकडे येणाऱ्या वाहनांना मुरबाडच्या वेशीवर बारवी डॅम फाटा येथे प्रवेशबंदी करण्यात येणार आहे. या वाहनांसाठी पर्यायी मार्ग हा बारवी धरण रस्ता - बदलापूर रस्ता बदलापूर पालेगाव नेवाळी नाका - मंलग रस्ता - लोढा पलावा/शिळ-डायघर रस्ता पत्रीपुल कल्याण मार्गे पुढे जातील. मुरबाडकडून शहाड पुलावरून कल्याणकडे जाणाऱ्या या वाहनांना दहागाव फाटा रायते गाव येथे प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्यांच्यासाठी पर्यायी मार्ग हा दहागाव फाटा रायतेगाव येथून - वाहोली - मांजर्ली - दहागाव एरंजडगाव बदलापूर पालेगाव नेवाळी नाका - मंलग रोड - लोढा पलावा/शिळडायघर रोड पत्रीपुल - कल्याण असा असेल. - तर कल्याणकडून मुरबाडकडे जाणाऱ्या वाहनांना दुर्गाडी पुलाजवळ प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्या वाहनांना पर्यायी मार्ग हा पत्रीपुल चक्कीनाका गोविंदवाडी बायपास - नेवाळी -पालेगाव - बदलापूर मार्गे मुरबाड असा असेल.

**वेळेची मर्यादा :** या पर्यायी मार्गावरून जड व अवजड वाहनांना दररोज सकाळी ६.०० ते ११.०० आणि संध्याकाळी ५.०० ते १०.०० या वेळेत प्रवेशबंदी राहील. या काळात फक्त हलकी वाहनेच या मार्गावरून जाऊ शकतील. या अधिसूचनेतून पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरिडॉर, ऑक्सिजन गॅस वाहने आणि इतर अत्यावश्यक सेवांतील वाहने यांना सूट देण्यात आली आहे.

## लक्षवेधी

## गोरेगाव-मुलुंड लिंक रोड प्रकल्पाचे काम सुरु

### लिंक रोडमुळे कोंडीतून दिलासा मिळणार नवी मुंबई काही मिनिटांत गाठता येणार !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : मुंबईतील गोरेगाव-मुलुंड लिंक रोड प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत, गोरेगावमधील दादासाहेब फाळके फिल्म सिटीमध्ये ५.३ किलोमीटर लांबीचा, तीन पदरी जुळा बोगदा बांधला जात आहे. कामासाठी आवश्यक असलेल्या दोन अत्याधुनिक टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) पैकी एकाचे सर्व घटक जागेवर पोहोचले आहेत. ऑगस्ट २०२६ मध्ये प्रत्यक्ष उत्खनन सुरू झाल्यानंतर कामाला आणखी वेग येईल.**

मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी हा प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. हा प्रकल्प मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा चौथा मोठा रस्ता असेल. यामुळे उत्तर मुंबईतील वाहतुकीत लक्षणीय सुधारणा होईल. महत्त्वाकांक्षी गोरेगाव-मुलुंड लिंक प्रकल्प चार टप्प्यात विभागलेला आहे. फेज ३ (ब) मध्ये दादासाहेब फाळके फिल्म सिटीमध्ये ५.३ किलोमीटर लांबीच्या, तिहेरी लेन बोगद्याचे बांधकाम समाविष्ट आहे.

आवश्यक असलेल्या लाँचिंग शाफ्टचे उत्खनन पूर्ण वेगाने सुरू आहे. अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी अलीकडेच कामाची पाहणी केली आणि आवश्यक सूचना दिल्या. अतिरिक्त आयुक्त बांगर यांनी दादासाहेब फाळके फिल्म सिटी परिसरात असलेल्या जोश मैदानाची पाहणी केली. भूमिगत जुळ्या बोगद्यांच्या बांधकामासाठी दोन अत्याधुनिक टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) आवश्यक असतील. यापैकी एका मशीनचे सर्व भाग जोश मैदानात पोहोचले आहेत.

## ट्रकखाली सापडून बालकाचा मृत्यू

### शिळफाटा रस्त्यावर सोनारपाडा येथील घटना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शिळफाटा रस्त्यावर शनिवारी रात्री ट्रक खाली चिरडून एक अडिच वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर ट्रक चालक ट्रक घटनास्थळी सोडून पळून गेला. मानपाडा पोलिसांनी ट्रक जप्त केला आहे. फरार ट्रक चालकाचा पोलीस शोध घेत आहेत. कविश जयंत झांबरे (अडिच महिने) असे ट्रक खाली चिरडून मरण पावलेल्या बालकाचे नाव आहे. कविश आपल्या कुटुंबीयांसह डोंबिवली पूर्वेतील नांदिवली टेकडीवरील नांदिवली हेल्थ व्यू सोसायटीत राहत होता. या मृत्यूप्रकरणी कविशचे वडील जयंत झांबरे यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी ट्रक चालका विरूध्द भारतीय न्याय संहितेच्या सन २००३ १०६ (१) २८१८ सह मोटार वाहन कायद्याने गुन्हा दाखल केला आहे

## माजी आ. नरेंद्र पवार यांच्या हस्ते आयुष्यमान भारत आरोग्य केंद्राचे भुमिपुजन



माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांच्या प्रयत्नाना यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रत्येक भागात आयुष्यमान भारत आरोग्य केंद्र पाहिजे तेथे गोरगरीब जनतेवर उपचार झाले पाहिजेत,त्याचाच एक भाग म्हणून महापालिकेच्या सहकार्याने व माजी उपमहापौर उपेक्षा शक्तींवान भोईर यांच्या सातत्या पाठपुराव्याने टिटवाळा गणेश मंदिर रोड रिजीन्सी जवळ येथे आरोग्य केंद्र साठी पंचवीस लाख रुपये निधी केंद्र सरकारने मंजुर केले आहेत, माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आयुष्यमान भारत आरोग्य केंद्राचे भुमिपुजन करण्यात आले, यासमयी माजी उपमहापौर उपेक्षा शक्तींवान भोईर, माजी उपमहापौर बुधाराम सरनोबत, माजी नगरसेवक सुरेश भोईर, टिटवाळा मंडळाचे अध्यक्ष शक्तीवान भोईर, उद्योग आघाडीचे प्रदेश सरचिटणीस परेश गुजरे,वाडे अध्यक्ष अध्यक्ष रुपेश भोईर, दिपक काबळे,किरण रोठे, हेमंत गायकवाड, युवा अध्यक्ष गिरीश भोये,सरचिटणीस संतोष शिंगोले, अशोक पाटील, संदिप गायकवाड, विनायक भोईर, दिलीप तरे,निती पाठक, यशोदा पाटील, यामिनी चव्हाण, ब्रिजेश पांडे, विजय आव्हाड, संजय अडागळे, विलास वारघडे, शैलेश गिरी,अनिरुद्ध राणे,यांच्या सह भाजप पदाधिकारी व महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी सांगितले की गरीबांना हि आरोग्य सुविधा उपलब्ध झाली पाहिजे व ती कमी दरात तसेच जर मोठे उपचारासाठी जास्त खर्च येणार असेल तर केंद्र सरकारने आयुष्यामान भारत योजना सुरू केली आहे,एका व्यक्तीला पांच लाख पर्यंत सरकार कडून खर्च केला जाणार आहे, म्हणून कोणीही व्यक्ती वैद्यकीय उपचार पासून वंचित राहू नये, तसेच प्रत्येक भागात आयुष्यमान भारत आरोग्य केंद्र सुरू केले आहेत त्याचा फायदा नागरिकांनी घेतला पाहिजे, टिटवाळा येथील आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी महापालिका प्रशासन यांचे सहकार्य व माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांचे सातत्याने पाठपुरावा सुरू होता लवकरच हे केंद्र उभे राहिले व जनतेला आरोग्य सेवा मिळेल असे सांगितले.

### बदलापूरात

## भाजप उभारणार बाळासाहेबांचा पुतळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** कुळगाव-बदलापूर नगरपालिकेवर भाजपचा नगराध्यक्ष निवडून आल्यानंतर घेतला जाणारा पहिला निर्णय म्हणजे शहरात हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा भव्य पुतळा उभारण्याचा असेल, अशी घोषणा भाजप आमदार किसन कथोरे यांनी भाजप कार्यकारिणीच्या बेठकीत नुकतीच केली आहे. बाळासाहेबांच्या पुतळयाचे काम पूर्ण करू न शकलेल्या शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्यावर कथोरे यांनी यातून निशाणा साधला आहे. त्यामुळे थेट बाळासाहेबांच्या नावेच शिवसेनेला निवडणुकीत कोंडीत पकडण्याची रणनीती भाजपने आखली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या भाजप कार्यकारिणी जाहीर करण्याच्या कार्यक्रमात आमदार कथोरे यांनी नगरपालिकेवर भाजपचा नगराध्यक्ष निवडून आल्यानंतर घेतला जाणारा पहिला निर्णय म्हणजे शहरात हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा भव्य पुतळा उभारण्याची घोषणा करीत कार्यकर्त्यांना उत्साहित केले. यावेळी त्यांनी शिवसेनेच्या स्थानिक नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करत म्हटले की बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आम्हीही मानतो. मात्र त्यांच्या नावाने कोणी पैसा खात असेल तर त्याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही असे सांगत शिवसेनेच्या शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्यावर थेट टोला असल्याचे बोलले जात आहे.

बदलापूरमध्ये कथोरे आणि म्हात्रे यांच्यातील संघर्ष विधानसभा निवडणुकीपासूनच सुरू असून, आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तो अधिक तीव्र झाला आहे. तर वामन म्हात्रे यांनी सोनिवलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामावरून आमदार कथोरे यांच्यावर टीका करत लक्ष्य केले होते. त्यास प्रत्युत्तर म्हणून कथोरे यांनी आधी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर बोला, असा म्हात्रे यांच्यावर पलटवार केला होता त्यात ऐन निवडणुकीच्या तोंडावर आता बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याची घोषणा करून कथोरे यांनी शिवसेनेला राजकीय खिंडीत पकडल्याची चर्चा शहरात रंगली आहे.



### शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या भव्य स्मारकातून नव्या पिढीला ऊर्जा...

**शिवसेनाप्रमुख आदरणीय स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे प्रखर व जाज्वल्य विचारांवर अनेक पिढ्या घडल्या. हिंदूस्थानातील जनतेलाही स्फूर्ती मिळाली. आपल्या कुळगांव-बदलापूर शहरातही शिवसेनाप्रमुखांचे स्मारक उभारल्यास नव्या पिढीला ऊर्जा व चेतना मिळू शकेल. त्यादृष्टीकोनातून भाजपाचे लोकप्रिय आमदार श्री. किसनजी कथोरे यांनी नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपाची सत्ता आल्यानंतर आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा केली आहे.**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सोनिवलीत उभारलेले स्मारक हा बदलापूरकरांचा मानबिंदू आहे. आगामी काळात उभारण्यात येणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारकही महाराष्ट्रात आदर्श ठरेल, हे निश्चित.**

## डोंबिवलीत केडीएमसीचे अतिक्रमण हटाव अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** गणेशोत्सव, दहीहंडीपासून सण-उत्सवांच्या निमित्ताने डोंबिवली शहरात लागलेल्या राजकीय कमानी दिवाळीचा सण सरताच हटण्यास सुरुवात झाली आहे. या 'शुभेच्छा देण्याच्या' नावाखाली उभारलेल्या भव्य कमानी आगामी स्थानिक निवडणुकांचा अनाहूत राजकीय प्रचार म्हणूनही पाहिल्या जात होत्या. डोंबिवली शहरात प्रत्येक सण राजकारणासाठी एक व्यासपीठ बनतो, हे यावर्षी पुन्हा एकदा दिसून आले. दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीमध्ये विविध पक्षांनी सामाजिक शुभेच्छा देत नागरिकांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला.

फडके रोड, स्थानक परिसर, विष्णुनगर, गोपाळनगर, मानपाडा रोड, टिळकनगर येथे मोठ्या प्रमाणात कमानी उभारल्या जातात. भाजप, शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट, मनसेसह सर्वच राजकीय पक्ष कमानी उभारण्यास पुढे असतात; मात्र यंदा यात भाजप आणि शिंदे गटाच्या कमानींची संख्या लक्षणीयरीत्या जास्त होती. 'शुभेच्छांच्या' आडून कार्यकर्त्यांनी स्थानिक वॉर्ड पातळीवर आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे या कमानींची स्पर्धा 'कोणाचा प्रभाव जास्त' या चर्चेचा विषय बनली होती.

### दिवाळीनंतर हटविल्या राजकीय कमानी





पालिकेचे अतिक्रमण हटाव अभियान सण-उत्सव संपल्यानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने शहरातील बॅनर, फलक हटविण्यास सुरुवात केली आहे. मंडळांचे तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी लावलेल्या कमानी हटविण्यास सांगण्यात आले असून, त्यानुसार कमानी हटण्यास सुरुवात झाली आहे. या कमानी हटवण्यास सुरुवात झाली असली तरी, राजकीय छाप मात्र नागरिकांच्या मनात राहिली आहे. कोणत्या नेत्याने कोणत्या भागात किती कमानी उभारल्या, त्यावरून स्थानिक नेत्यांची संघटनात्मक ताकद मोजली जात असल्याचे बोलले जात आहे. कमानी हटल्या असल्या तरी राजकीय शुभेच्छांचा आणि जनसंपर्काचा हंगाम अजून संपलेला नाही. स्थानिक पातळीवर उमेदवारांची तयारी आणि नवे चेहरे पुढे आणण्याचे प्रयत्न वेग घेत आहेत. त्यामुळे डोंबिवलीत दिवाळीनंतरही 'राजकीय रोषणाई' कायम आहे.







रेसिपी

# पाकातले चिरोटे

**साहित्य :**
मैदा - ३/४ कप,रवा - १/४ कप,तूप - १ टेस्पून (मोहनासाठी),दुध - अंदाजे १/४ कप,तूप - ३ ते ४ टेस्पून (वितळलेले),कॉर्न फ्लोअर - २ ते ३ टेस्पून,तूप - तळण्यासाठी,साखर - १ कपपाणी - ३ ते ४ टेस्पून,मीठ - चिमुटभर



**कृती :**
सगळयात आधी रवा आणि मैदा एका बाऊलमध्ये घ्या. त्यात चिमूटभर मीठ घाला. मिश्रण व्यवस्थित मिसळून त्यात कडकडीत गरम तुपाचे मोहन घाला. आता अंदाजे दुध घाला आणि मध्यमसर घट्ट गोळा भिजवा. हा गोळा २० मिनिटे झाकून ठेवा. यानंतर भिजवलेल्या गोळयाचे सारखे भाग करा आणि त्यातील ३ भाग घेउन बाकीचे ३ भाग नंतरसाठी झाकून ठेवावे.
पीठ न लावता प्रत्येक गोळयाची पातळ पोळी लाटा. यानंतर तूप वितळवून त्यात कॉर्न फ्लोअर घालून पातळ पेस्ट बनवा.
एक एक पोळी लाटून घ्या. आता एका लाटलेल्या पोळीवर बनवलेली पेस्ट पसरवा आणि त्यावर दुसरी लाटलेली पोळी ठेवा.
आता दोन्ही पोळया दोन विरुद्ध बाजूंनी गुंडाळत मध्यभागी आणा आणि मग एक गुंडाळी दुसरीवर ठेवून घट्ट रोल बनवा.
अशाप्रकारे पोळयांचे रोल बनवून थोडावेळ न झाकता तसेच ठेवा. जेणेकरून तूप गोठेल आणि रोल हाताळण्यायोग्य होईल. मधल्या वेळेत साखर- पाणी एकत्र करून गोळीबंद पाक तयार करून घ्या.
थोड्यावेळाने रोल सुकले की, कढईत तूप गरम करा आणि रोलचे १ - १ इंचाचे तुकडे करून घ्या. हे तुकडे लेयर असलेली बाजू वर ठेवून हाताच्या दाबाने चपटे करून घ्या.
अशाप्रकारे सर्व चिरोटे तयार झाले की, तुपात मंद आचेवर तळून घ्या. तळलेले चिरोटे थोडे कोमट झाले की, साधारण गरम असलेल्या पाकात मिनिटभर बुडवून बाहेर काढावा आणि उभा करून ठेवा. तुमचे पाकातले चिरोटे तयार

# तुळसी विवाह

कॅलेंडरनुसार 2 नोव्हेंबर म्हणजेच आजपासून तुळशी विवाहाचा पवित्र सण सुरू झालेला आहे. पौर्णिमेच्यापर्यंत हा दिवस महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या द्वादशी तिथीला येतो, जो देवुथनी एकादशी नंतरच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी भगवान विष्णूच्या शालिग्राम रूपाचा आणि तुळशी मातेचा विवाह सोहळा पार पडतो. हा तुळशी विवाह आपल्या समाजात लग्न सोहळ्याला सुरूवात करण्याचे प्रतीक मानले जाते. तर या तुळशी विवाहाच्या दिवशी पूजेमध्ये थोडीशी चूक देखील अशुभ मानली जाते. तर या शुभ दिवशी काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. चला तर मग आजच्या लेखात आपण तुळशी विवाहाशी संबंधित महत्त्वाच्या गोष्टी, पूजेची पद्धत आणि काय करावे आणि काय करू नये हे जाणून घेऊयात.



**तुळशीच्या विवाहवेळी चुकूनही या चुका करू नका का ?**

– लक्ष्मी माता ही तुळशीमध्ये वास करते. या दिवशी तुळशीची पाने चुकून तोडली तर तो देवीचा अपमान मानला जातो. कारण आपल्या हिंदू धर्मात नैवेद्य दाखवण्यासाठी तुळशी पानं नैवेद्याच्या ताटात ठेवली जातात. तर यासाठी एक दिवस आधीच तुळशीची पाने तोडून ठेवा.
– आंघोळ न करता तुळशीच्या रोपाला स्पर्श करणे अशुभ मानले जाते. यामुळे पूजेचे फायदे मिळत नाहीत.
– तुळशी विवाह हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. त्यासाठी या दिवसांमध्ये घरात तामसिक पदार्थांचे सेवन करणे टाळा.
– तुळशीजवळ शिवलिंग ठेऊ नका कारण यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा येऊ शकते, आर्थिक नुकसान होऊ शकते आणि कामांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.
पौराणिक कथेनुसार, तुळशीचे मागील जन्म 'वृंदा' होते, जी असुर जालंधरची पत्नी होती. भगवान शिवाने जालंधराचा वध केल्यावर वृंदाने शिवाला शाप दिला की त्यांची पूजा तुळशीच्या पानांनी होणार नाही.
– तुळशी विवाहाच्या वेळी घरातील वातावरण शांत, श्रद्धाळू आणि आनंदी असले पाहिजे. भांडणे, वादविवाद किंवा मोठा आवाज लक्ष्मी-विष्णू यांचे आशीर्वाद मिळत नाही.
– तुळशी विवाहाच्या दिवशी भगवान शालिग्राम आणि तुळशी मातेला गंगाजल किंवा पंचामृताने स्नान केल्याशिवाय विवाह सोहळा सुरू करू नये.

**तुळशी विवाहाच्या वेळी काय करावे ?**

संध्याकाळी, पूजास्थळ किंवा अंगण रांगोळी काढून सजवा. तुळशीच्या रोपावर उसाचा एक सुंदर मंडप तयार करा.
एका पाटावर पिवळ्या कापडात भगवान शालिग्राम आणि दुसऱ्या बाजूला तुळशीमातेची स्थापना करा.
तुळशी विवाह सोहळा फक्त संध्याकाळी किंवा शुभ मुहूर्तावर सुरू करा.
तुळशीमातेला लाल साडी आणि संपूर्ण श्रृंगार अर्पण करा. शालिग्राम यांना पिवळे कपडे आणि पवित्र धागा बांधा. तसेच शालिग्राम यांना चंदनाचा गंधक लावा आणि तुळशीमातेला कुंकू गंध लावा. त्यानंतर प्रथेप्रमाणे तुळशी विवाह सोहळ्याला सुरूवात करा.
तुळशी विवाह सोहळा संपन्न झाल्यावर हात जोडून तुळशी माता आणि शालिग्राम यांच्या कडून क्षमा मागा आणि नकळत कोणतीही चूक झाली असेल तर क्षमा मागा.

# भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदूरत्न पुरस्काराचे सुनील इंगळे मानकरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पुणे** : वृत्तपत्र लेखनातील पत्रकारितेसोबत सामाजिक क्षेत्रातील सेवाभावी वृत्ती व निवृत्तीनंतरच्या जीवनातही या क्षेत्रात सक्रिय राहण्याच्या या त्यांच्या कारकिर्दीची दखल घेऊन,भविष्यातही असेच कार्यरत राहण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळण्यासाठी पद्मश्री मणिभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट,क्रीडा मंत्रालय-केंद्र सरकार व निती आयोग संलग्नित,दिल्ली नामांकित डॉ.रविंद्र भोळे आरोग्य केंद्र यांच्या वतीने मोठ्या सन्मानाचा आणि अत्यंत प्रतिष्ठतेचा हा राष्ट्रीय पुरस्कार श्री.सुनील इंगळे यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा खासदार प्रा.डॉ.मेघाताई कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष हिंदूरत्न सन्माननीय डॉ.रविंद्र भोळे (अध्यक्ष-मणिभाई मानव सेवा ट्रस्ट) यांच्यासोबत विविध क्षेत्रातील मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. भारताचे पहिले गृहमंत्री,भारतरत्न भारताचे एकमेव लोहपुरुष यांनी अखंड भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देशातील 560 संस्थानांचे विलीनीकरण करून



एक संघ भारत निर्माण करणारे भारताचे पहिले गृहमंत्री,या महापुरुषाच्या 150 व्या जयंतीदिनी,राष्ट्रीय एकता दिनी मला त्यांच्या नावाने भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदूरत्न पुरस्कार प्राप्त झाला,त्यामुळे मी धन्य झालो आहे, मी हिंदू असल्याचा मला अभिमान आहे असे मत यावेळी पुरस्कार प्राप्त सुनील इंगळे यांनी व्यक्त केले. अशा आगळयावेगळया समाजाभिमुख,लोकाभिमुख व्यक्तिमत्त्वाचे समाजातील विविध स्तरातून कौतुक होत आहे व भावी उपक्रमांसाठी समाजातील मान्यवरांनी,मित्र परिवारांनी,शुभचिंतकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला पाहिजे - डॉ. संजय वाघ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : शिक्षक समृद्ध झाला तरच विद्यार्थी समृद्ध होतील. चांगल्या शिक्षकांचे नाव विद्यार्थी आयुष्यभर लक्षात ठेवतात. त्यामुळे शिक्षकांनी हे पुण्याचे काम तन-मन लावून करावे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला पाहिजे असे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रहाटोली जि. ठाणे (डायट)चे प्राचार्य डॉ. संजय वाघ यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, ठाणे मनपा शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे, गट अधिकारी संगिता बामणे, युआरसी समन्वयक रविंद्र पाटील व मुश्ताक पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली नवनियुक्त शिक्षकांसाठी दि.२५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २५ या कालावधीमध्ये मनपा शाळा क्रमांक 19, विष्णूनगर, ठाणे येथे नवनियुक्त शिक्षक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणात ठाणे मनपा व मीरा भाईंदर मनपातील मनपा शाळा व खाजगी अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या शैक्षणिक स्तरावर नियुक्त झालेल्या नवीन ६९ शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

सदर प्रशिक्षणात शैक्षणिक वातावरण व कार्यपद्धती, अध्यापन पद्धती, मूल्यमापनाच्या



नवीन पद्धतींची ओळख,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020, सामाजिक व भावनिक अध्ययन, भविष्यवेधी शिक्षण, शैक्षणिक साहित्याची निर्मिती व वापर, शालेय स्पर्धा परीक्षा, निपुण भारत अभियान, शिक्षक स्व - विकसन, व्यवस्थापन, शालेय स्तरावरील समित्या, विविध व्यासपीठ व शिक्षण संस्था या विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले.
यावेळी दिलीप शेवाळे, अंकुश हांडे यांनी प्रशिक्षण समन्वयक म्हणून काम पाहिले तर संजय पाटील, कांचन गायकवाड, सविता गोसावी यांनी सुलभक म्हणून काम केले. लता जामदार, सुरेश पाटील, निवृत्ती भेरे, सारिका तेलवणे यांनी प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## आमदार किसन कथोरेंच्या हस्ते

# धसईतील स्व. शांतारामभाऊ घोलप चौकाचे व सेवा सोसायटीच्या ईमारतीचे लोकार्पण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील ऐतिहासिक धसई नाक्यावरील माजी मंत्री स्व.शांतारामभाऊ घोलप चौकाचे सुशोभिकरण व धसई सेवा सोसायटीच्या नुतन ईमारतीचे लोकार्पण आमदार किसन कथोरेंच्या हस्ते आज करण्यात आले.
धसई हे माजी महसूल मंत्री शांतारामभाऊ घोलप यांचे गाव असून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. घोलप साहेबां नंतर धसई गावचा विकास रखडलेला होता परंतु आमदार किसन कथोरे यांनी धसईवर विशेष लक्ष देऊन चेहरा मोहरा बदलला



असून आज येथे शांतारामभाऊ घोलप चौकाचे नव्याने सुशोभिकरण केले व त्याचे लोकार्पण घोलप साहेबांच्या पत्नी सुमनकाकू घोलप यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तर धसई सेवा सोसायटीच्या माध्यमातून भव्यदिव्य व सुंदर अशी व्यापारी ईमारत बांधली असून तिचे लोकार्पण ही आज करण्यात आले.
त्यानंतर जिल्हा परिषद गट धसई व सरळगाव यांची सयुंक्त कार्यकर्ता आढावा बैठक नुतन ईमारतीच्या सभागृहात आमदार कथोरेंच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी आमदार कथोरे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना 2029 ला मतदार संघ बदलू शकतो त्यामुळे काय होईल ते आताच करून घ्या. तुमच्या विभागाचे परिवर्तन करा. केवळ भाषणे नको तर कृती करा. आता या निवडणुकीत तुमची परिक्षा आहे. ज्यांना मी मोठे केले, गुलाल चढवला त्यांनीच मला पाडण्यासाठी काम केले. माझ्या विरोधात सगळे हौशे, नवसे,गवसे एक झाले होते. पण सामान्य जनता माझ्या सोबत होती.कधी नव्हे तो त्रास मला झाला असला तरी आता खरी परिक्षा तुमची आहे अशा शब्दात उपस्थित पुढारी व कार्यकर्ते यांची कान उघाडणी केली. तसेच केंद्र सरकारच्या वतीने दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी मुरबाड तालुका निवडला असून येणाऱ्या 8,9,10 तारखेला केंद्र सरकारची टीम येणार असून सर्वांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन यावेळी केले.
या कार्यक्रमासाठी उल्हास बांगर, सुहास मोरे, दिपक पवार, सुरेश बांगर, जितेंद्र भावार्थे, अनिल घरत,गणेश कथोरे,धसई सेवा सोसायटी चेअरमन अविनाश मोहपे, मा. चेअरमन लक्ष्मण गोल्हे,मोहन सासे,संतोष भांगरथ, दिनेश ऊघडे, अशोक मोरे, परेश मोरे, अभिजीत घोलप,विजय भोईर,सुवर्णा ठाकरे, ज्योती गोडांबे, पुनम पवार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# माकडाला विद्युत तारेचा झटका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : घोडबंदर येथील टिकुजीनीवाडी भागात एका माकडाला विद्युत तारेचा झटका बसला. य घटनेत माकड जखमी झाले असून त्याच्यावर प्राण्यांच्या दवाखान्यात उपचार सुरु आहेत. हे माकड संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून परिसरात आले होते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातून अनेक माकडे टिकुजीनीवाडी परिसरात येत असतात. या भागात विद्युत तारा देखील आहेत. माकडे वृक्षावरून या




विद्युत तारांवरुन जातात. रविवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास येथील एका विद्युत तारेचा झटका माकडाला बसला. त्यानंतर ते माकड जखमी अवस्थेत एका वृक्षाच्या फांदीवर बसले होते. घटनेची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला मिळाल्यानंतर ठाणे महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान, वाईल्ड वेल्फेअर असोसिएशन (डब्यूडब्यूए) या प्राणीमित्र संस्थेचे स्वयंसेवक, वन विभाग, महावितरणचे कर्मचारी दाखल झाले.
पथकाने या माकडाला सुखरुप पकडले. त्यानंतर त्याला वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने सीपीसीए पशुवैद्यकीय दवाखाना येथे दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरु होते.

# आदिवासींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

## कादंळी, तळवली येथील आदिवासींना वस्तूंचे वाटप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तेथेची साधु ओळखावा, देव तेथेची जाणावा" हा उद्देश डोळयासमोर ठेऊन भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या कादंळी, तळवली येथील आदीवासी नागरीकांना एका सेवा भावी संस्थेच्या वतीने जिवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.
बोरीवली जिल्हा परिषद गटातील कादंळी व तळवली येथील आदीवासी नागरीकांना राष्ट्रसंत परम गुरुदेव श्री नम्रमुनी महाराज,



परसधाम व अर्हम युवा सेवा गृप यांच्या सौजन्याने कपाट, भांडी, ब्लॅंकेट जिवनावश्यक वस्तू, धान्य वाटपाचा कार्यक्रम जिल्हा परिषद शाळा कातकरीवाडी कादंळी व तळवली आदीवासी वाडी येथे रविवारी घेण्यात आला सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री मिनाक्षी फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख विष्णुदादा चंदे ठाणे जिल्हा परिषदेच्या माजी सभापती वैशाली चंदे व सरपंच नम्रता जाधव, ग्रामपंचायत सदस्य वृषाली महेंद्र चंदे, समाजसेवक महेंद्र चंदे व अर्हम गृप युवा सेवा गृपचे सदस्य व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थीत उपस्थित होते.




**मेष**
भावा-बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**
तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**मिथुन**
मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल आणि बिघडलेली कामेही पूर्ण होतील.

**कर्क**
लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. आजचा काळ अनुकूल आहे, परंतु तुमच्या मेहनतीचे चांगले फळ मिळण्यासाठी तुम्हाला कृतीशील राहावे लागेल.

**सिंह**
सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. अधिकाऱ्यांचाही दबाव असेल.तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**कन्या**
आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते. दिवस चांगला असेल.

**तूळ**
काही नवीन कल्पनांवरही काम कराल.मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील.दिनचर्येत बदल होईल.

**वृश्चिक**
मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**धनु**
कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.कामाच्या क्षमतेत मोठा बदल होईल.

**मकर**
तुम्हाला बालपणीचा एखादा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून तुम्हाला आनंद होईल.काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**कुंभ**
जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो. तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल.

**मीन**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. तुमचा सन्मान होईल. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते.




नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# अवकाळी पावसामुळे कोकणातील बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**- आ. ज्ञानेश्वर म्हात्रे**

**ठाणे :** कोकण विभाग शिक्षण मतदारसंघात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या संख्या आहेत. कोकणात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर मात्रे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कोकण शिक्षक मतदार संघ हा बहुतांशी आदिवासी, डोंगरी व सागरी असा आहे. येथे शेती हा प्रमुख व्यवसाय व उपजीविकेचे साधन आहे. ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यामध्ये तांदळाच्या पिकासोबत पालेभाज्या व फळभाज्यांचे उत्पादन शेतकरी घेतात. त्यावरच त्यांच्या उदरनिर्वाह होत असतो. या जिल्ह्यातील शेतकरी जास्तीत जास्त भातशेती करून पिकवलेल्या भाताची विक्री करून आर्थिक कमाई करतात. त्यावर त्यांची वार्षिक आर्थिक उलाढाल होत असते. साधारण ऑक्टोबर व न नोव्हेंबर या कालावधीमध्ये भाताच्या पिकाची कापणी करून साठवणूक केली जाते. मात्र या कालावधीत पावसाने धुमाकूळ घातल्याने त्यांची वार्षिक आर्थिक उलाढाल संपल्यात जमा झाल्याची त्यांनी नियोदनात नमुद केले आहे. कोकणातील शेतकऱ्यांच्या शेतीत लक्ष्मीपूजनापासून ते आतापर्यंत परतीच्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. यामुळे ओला दुष्काळ निर्माण झालेला आहे. ठाणे, पालघर, रायगड व कोकण परिसरात पावसामुळे शेतकऱ्यांनी मेहनतीने पिकवलेले भाताचे व अन्य पीक पूर्णतः भिजवून गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शने आणून दिले आहे.

# त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री सुपरमून दर्शन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** येत्या बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी, त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री आकाशात सुपर मून दिसणार असल्याचे पंचांगकर्ते खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी सांगितले. याविषयी अधिक माहिती देताना श्री. सोमण म्हणाले की, पौर्णिमेच्या दिवशी जर चंद्र पृथ्वीच्या जवळ असेल तर चंद्रबिंब जास्त मोठे आणि जास्त तेजस्वी मनोहारी दिसते. तसे ते बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी रात्री दिसणार आहे.

चंद्र पृथ्वीपासून सरासरी तीन लक्ष ८४ हजार किमी अंतरावर असतो. या दिवशी तो पृथ्वीपासून तीन लक्ष ५६,८३४ किमी अंतरावर येणार आहे. पौर्णिमेच्या दिवशी जर चंद्र पृथ्वीपासून दूर असेल तर चंद्रबिंब लहान आणि कमी तेजस्वी दिसते. याला मायक्रो मून म्हणतात. सुपर मून हा मायक्रो मूनपेक्षा १३ टक्के मोठा आणि ३० टक्के जास्त तेजस्वी दिसतो. तसा तो बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी रात्री दिसणार आहे.

बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी सुपर मून सायंकाळी ५.४४ वाजता पूर्वेला उगवेल आणि रात्रभर सुंदर दर्शन देईल. या पुढील सुपर मून पुढच्याच महिन्यात गुरूवार ४ डिसेंबर रोजी दत्तजयंतीच्या रात्री दिसणार असल्याचे श्री. दा. कृ. सोमण यांनी सांगितले.


## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला,
कल्याण- शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ ,e mail :- apmckalyan@rediffmail.com

### जाहिर नोटीस

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, मुख्य मार्केट यार्डातील जनावरे बाजार विभाग १ व २ या ठिकाणी वेगवेगळे गवत विक्री स्टॉल (जनावरांचे खाद्य), दुध विक्री स्टॉल व चहा कॅन्टीन स्टॉल उभारणीसाठी खुली जागा निवीदा मंजुर झाल्याच्या दिनांका पासुन पुढे ३३ महीने करारावर (तात्पुरत्या स्वरुपात ) वापरावयास उपलब्ध करुन देत आहे.

यासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत असुन या संदर्भात अटी-शर्ती व कोरे मागणी अर्ज समितीच्या कार्यालयात र.रु. ५००/- ना परतावा भरल्यानंतर कार्यालयीन वेळेत मंगळवार दि. ०४.११.२०२५ ते दि. ७.११.२०२५ पर्यंत मिळतील. भरलेले सिलबंद अर्ज मंगळवार दि.११.११.२०२५ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सिलबंद अर्ज बुधवार दि.१२.११.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उपस्थित निविदाकारांचे समोर उघडण्यात येतील.

आलेले एक अथवा सर्व अर्ज स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार बाजार समितीने राखुन ठेवला आहे.

**जा क्र. कृउबास/जनावरे बाजार आवार स्टॉल/ जाहिरात १२९४/२०२४**
**दि. ३१/१०/२०२५**

**सही/-**
**(संजय ग. एगडे)**
**सचिव**

**सही/-**
**(रविंद्र ना. घोडविंदे)**
**सभापती**

**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण**
**जि. ठाणे**


# खड्डेमुक्त रस्ता पुन्हा खड्ड्यात

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासाठी घोडबंदरचा रस्त्याची महिनाभरापूर्वीच डागडुजी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** सप्टेंबर महिन्यात मेट्रोच्या ट्रायल रनसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री घोडबंदर भागात आले होते. त्यांच्यासाठी रस्ता खड्डेमुक्त करण्यात आला. परंतु आता महिना उलटत नाही, तोच येथील चकाचक केलेला रस्ता पुन्हा खड्यांत गेला आहे. त्यामुळे दर महिन्याला या दोन्ही नेत्यांनी घोडबंदरला यावे, अशी अपेक्षा रहिवाशांनी केली आहे.

पावसाळ्यापासून घोडबंदर भागातील रस्त्याची चाळण झाली आहे. काही मराठी कलाकारांनी या रस्त्यावरून प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांवर आगपाखड केली.




खड्ड्यांचा मुद्दा घेऊन गेल्या दोन महिन्यांपासून येथील रहिवासी वारंवार रस्त्यावर उतरून उत्स्फूर्तपणे आंदोलन करीत आहेत.मेट्रोच्या ट्रायल रनसाठी आलेल्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना घोडबंदर येथील रस्ते गुळगुळीत दिसले. परंतु, महिनाभरातच पुन्हा रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली.

**रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे, वाहनचालकांची मोठी कसरत**

२२ सप्टेंबर रोजी मेट्रो चारची ट्रायल रन घेण्यात आली होती. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली होती.त्यांच्यासाठी येथील रस्ते चकाचक केले होते. आता महिना उलटत नाही, तोच या रस्त्यांना पुन्हा खड्डेच खड्डे पडले आहेत. रस्त्यांवर टाकलेले डांबरही वाहून गेले आहे.

# शेतकऱ्यांच्या लग्नाचा खर्च शिवसेना करेल

**- एकनाथ शिंदे**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** राज्यातील अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले असून या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी घोषणा केली आहे. अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे नुकसान झाल्याने सरकार मदत करेलच, पण ज्यांच्या घरी लग्न ठरले आहे ते लग्न मोडणार नाही, सर्व खर्च
शिवसेना करेल, असे शिंदे म्हणाले. पुण्यश्लोक ठाण्यातील



अहिल्यादेवी होळकर उपवनघाट येथे ५१ फूट उंच विठ्ठल मूर्तीचा अनावरण कार्यक्रम शुक्रवारी सायंकाळी आयोजित करण्यात केला होता. या सोहळयाला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक आदी उपस्थित होते.

शिदे महणाले की, ' पांडुरंगाची ५१ फूट उंच व्य मूर्तीची स्थापना ठाण्यात झाली आहे. हे कार्य प्रताप सरनाईक आणि त्यांच्या टीममुळे शक्य झाले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद होणार नाही, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# ठाणे-नाशिक मार्गावरील कोंडीत अर्ध्या तासाचा प्रवास तीन तासांवर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** दररोजच्या वाहतूक कोंडीमुळे ठाणे-नाशिक महामार्ग नेहमीच चर्चा विषय ठरला आहे. येथील वाहतूक कोंडीमुळे अर्ध्या तासाचा प्रवास तब्बल तीन तासांवर गेला असून मानसिक आणि शारीरिक त्रासही वाहनचालकांना भेडसावत असतो. विशेष म्हणजे या कोंडीत अडकलेल्या हजारो वाहनांच्या माध्यमातून वर्षभरात ५२०० कोटी ते ६६०० कोटी रुपयांचे इंधन नाहक जळून जाते, असा निष्कर्ष एका अभियांत्रिकी प्रशिक्षकाने काढला आहे.

बांधकामातील अभियांत्रिकी त्रुटींमुळे ठाणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीचा प्रवाह रोखला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. २३.८ किमी लांबीचा वडपे-माजिवडे विस्तार प्रकल्प आठ मार्गिकांच्या महामार्गात रूपांतरित केला जात आहे. यात ७६ टक्के काम पूर्ण झाले असले तरी परिणाम शून्य असल्याचे दिसत आहे. त्यामुळे एकाच वेळी संपूर्ण लांबीवर एकच मार्गिका बांधून पूर्ण केल्यास त्या टप्प्यातच फायदा मिळेल, यातून बांधकाम सुरू असतानाही वाहतूक सुरू राहील आणि वाहनांची गर्दीही होणार नाही, असे मत अभियांत्रिकी प्रशिक्षक राजेंद्र उत्तुरकर यांनी मांडले आहे. महामार्गावर मार्गिकांची संख्या सतत बदलते, त्यामुळे अरुंद मार्गिकेवर वाहतूक मंदावते. त्यामुळे एकसमान दोन मार्गिका संपूर्ण लांबीवर असाव्यात. बांधकामांमुळे अनेक ठिकाणी वाहनांना कमी वेगावर आणावे लागते. ही वळणे २०-३० अंशाच्या मर्यादेत पुन्हा डिझाईन करायला हवीत. विशेष म्हणजे पुरेसे दिशादर्शक फलक नसून लेन मार्किंगही अस्पष्ट आहेत. त्यामुळे वाहने अचानक मार्गिका बदलतात आणि अपघात होत असल्याचे श्री. उत्तुरकर यांचे म्हणणे आहे.

या महामार्गावर रोज ५० हजार वाहने सुमारे दोन तास वाहतूक कोंडीत अडकलेल्या अवस्थेत राहतात. त्यामुळे दररोज ६० हजार ते ८० हजार लिटर इंधन वाया जाते, म्हणजे दररोज ६० ते ८० लाखांचा अपव्यय होतो. त्याचवेळी ५० हजार लोक दररोज दोन तास गमावतात. म्हणजे दिवसाला एक लाख मानवी तास गमावतात. ३०० रुपये प्रति तास धरल्यास वार्षिक १०९५ कोटी उत्पादक वेळ वाया जातो. याशिवाय तासनतास वाहतूक कोंडीत अडकून राहिल्याने श्वसन, हृदयविकार, पाठीचे त्रास आणि मानसिक ताण वाढतात. तर एखादी रुग्णवाहिका कोंडीत अडकल्या जीव वाचवण्याची संधी कमी होते. त्यामुळे ही केवळ वाहतूक समस्या नसून हा मोठा राष्ट्रीय तोटा असल्याचे मत श्री. उत्तुरकर यांनी व्यक्त केले आहे.

ठाणे-नाशिक महामार्ग भिवंडी या आशियातील सर्वात मोठ्या गोदाम केंद्राला मुंबईच्या न्हावा-शेवा बंदराशी जोडतो. दिग्गज कंपन्यांची येथे प्रचंड लॉजिस्टिक सुविधा आहे. त्यामुळे हा महामार्ग अडल्यावर त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक रक्ताभिसरणावर होतो, असे मतही श्री.उत्तुरकर यांनी मांडले आहे.

# 'मराठी शाळेची तुकडी चालली पाहिजे'

## संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांचे प्रतिपादन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** शासनाने मराठी शाळांसाठी किमान पटसंख्या सांगू नये. एक विद्यार्थी जरी वर्गात असेल, तरी त्या विद्यार्थ्याला शिकवले पाहिजे. मराठी शाळेची तुकडी चालली पाहिजे. कुणास ठाऊक, त्या एका विद्यार्थ्यांतून संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर घडतील, असे प्रतिपादन ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि 'पानिपत' कादंबरीचे लेखक विश्वास पाटील यांनी शनिवारी ठाण्यात केले.

ठाणे महापालिकेच्या वतीने आयोजित पाटील यांचा सत्कार सोहळा नरेंद्र बल्लाळ सभागृहात पार पडला. यावेळी ते बोलत होते.

पाटील म्हणाले, मराठी भाषा अशा टप्प्यावर आहे, जिथे तिचे साहित्य आणि संस्कृती धोक्याच्या रेषेवर गेली आहे. जशी आपण आजारी आईची काळजी घेतो, तशीच काळजी आपण मराठी भाषेची घेतली पाहिजे. ती उराशी जपली पाहिजे, संवर्धन केले पाहिजे. शासनाकडून मदत मिळाली तर ती घ्यावी, पण भाषेचे रक्षण हे लोकांनीच करायचे असते, कारण हा लोकांचा उठाव



आहे.

मराठी शाळेतील विद्यार्थी अत्यंत बुद्धिमान असतात.

विश्वास पाटील म्हणाले, जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या शाळांमध्ये शिकणारी मुले अत्यंत बुद्धिमान असतात.

महाराष्ट्रातील राष्ट्रीय आणि 3 आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेले बहुतांश शास्त्रज्ञ हे अशाच मराठी माध्यमातील शाळांत शिकलेले आहेत.

माझ्या काळात वर्गात दहा-पंधरा 3 विद्यार्थ्यांची मर्यादा घालण्यात आली असती, तर मीसुद्धा आज येथे नसतो. त्यामुळे शिक्षणासाठी संख्या नव्हे, तर गुणवत्ता महत्त्वाची आहे, असे ते म्हणाले.

# रायगड जिल्ह्यात साजगावच्या यात्रोत्सवाला प्रारंभ

## कार्तिकी एकादशीनिमित्त भाविकांची गर्दी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड :** कार्तिकी एकादशीनिमित्त रविवारी (ता. २) रायगड जिल्ह्यातील सुमारे २१८ विठ्ठल मंदिरांत पहाटेपासूनच विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत भक्तिभाव आणि उत्साहात कार्तिकी एकादशी साजरी करण्यात आली. अलिबाग शहराजवळच्या वरसोली येथील प्राचीन आंग्रेकालीन विठ्ठल-रखुमाई मंदिरात पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. शहरातील व पाल्हे गावात एकादशीनिमित्त पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रति पंढरपूर म्हणून समजल्या जाणाऱ्या खालापूर तालुक्यातील साजगावच्या श्रीविठ्ठल मंदिरातही भक्तांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती. येथील यात्रोत्सवालाही रविवारपासून सुरुवात झाली. मंदिर विश्वस्त व संयोजन समितीच्या वतीने भाविकांना दर्शनात कोणतीही असुविधा होऊ नये, याकरिता उत्तम नियोजन केले होते. प्रसादाची व्यवस्था ठेवण्यात आली होती. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचाही ठिकठिकाणी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. एकादशीच्या आदल्या दिवसापासून मंदिर व्यवस्थापनाने जय्यत तयारीला सुरुवात केली होती. रविवारी पहाटे मंदिरांमध्ये श्रीविठ्ठल-रुक्मिणीची विधिवत पूजा पुरोहितांच्या हस्ते पार पडल्यानंतर मंदिरे दर्शनासाठी भाविकांसाठी खुली करण्यात आली. त्यानंतर दिवसभर मंदिरांसमोर भाविकांनी लांबच लांब रांगा लावून श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले. श्रीविठ्ठल-रुक्मिणीला तुळस प्रिय असल्याने ठिकठिकाणच्या मंदिरांसमोर तुळशीच्या माळा विकणाऱ्यांचीही गर्दी झाल्याचे दिसून आले. दिवसभर पावसाची रिपरिप सुरू असूनही दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

# अंबरनाथमध्ये प्रसिद्ध महिला डॉक्टरवर पतीचा जीवघेणा हल्ला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ :** अंबरनाथ येथील प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. किरण शिंदे यांच्यावर त्यांच्या पतीनेच घरगुती वादातून थेट खलबता मारत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना बुधवारी पहाटे घडली. शाळेतील मित्राने महिला डॉक्टरला 'नाईस डीपी' असा मेसेज केल्याच्या रागातून पतीने हल्ला केल्याचा आरोप आहे. त्यांच्या मुलाने बचाव केल्याने डॉ. शिंदे यांचा जीव वाचला. त्यांच्यावर बदलापूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपी पतीला ताब्यात घेतले असून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

डॉ. किरण शिंदे या अंबरनाथ पश्चिम येथील गृहसंकुलात पती आणि दोन मुलांसह राहतात. गेल्या काही काळापासून त्या आणि




त्यांचे पती यांच्यामध्ये कौटुंबिक वाद सुरू होते.

**नेमकं काय झालं?**

बुधवारी पहाटे साडेचार वाजता डॉ किरण या घरात गाण्याचा रियाज करण्यासाठी उठल्या. त्यांच्या सांगण्यानुसार त्यावेळी पती विश्वंभर शिंदे मुलाच्या रुममध्ये शांत बसले होते.

### शाळेतील मित्राने महिला डॉक्टरला 'नाईस डीपी' असा मेसेज केल्याच्या रागातून पतीने हल्ला केल्याचा प्रकार समोर

त्यांच्यासाठी चहा करण्यासाठी डॉ किरण स्वयंपाकघरात गेल्या. यावेळी त्यांच्यात आणि पतीमध्ये पुन्हा वाद झाला.

एक दिवस अगोदर आम्ही माथेरानला गेलो होते. त्यावर माझ्या शाळेतल्या फ्रेण्डने नाईस डीपी असं पाठवलं होतं. त्यांच्या मनात याचा राग होता. याच वादातून विश्वंभर यांनी स्वयंपाकघरात येऊन किरण शिंदे यांचा गळा पकडला आणि त्यांच्या डोक्यात खलबत्त्याने जीवघेणी मारहाण सुरू केली. जोरजोरात ओरडायला सुरुवात केली.

घाबरलेल्या डॉ. किरण यांचा आरडाओरडा ऐकून त्यांच्या मुलांनी स्वयंपाकघरात धाव घेत आईची सुटका केली. तरीही विश्वंभर यांची मारहाण सुरुच होती. शेवटी किरण यांच्या डोक्यातून रक्त निघायला लागलं. कपडे रक्ताने माखले. मुलं उठली नसती तर कदाचित माझा जीवही गेला असता, असं डॉ किरण म्हणाल्या.

या हल्ल्यात जखमी झालेल्या डॉ. किरण यांना तात्काळ बदलापूर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला. अंबरनाथ पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आरोपी पती विश्वंभर शिंदे याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.




# महिलेला पाहून शिट्टी वाजवणे विनयभंगाचा गुन्हा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** महिलेला पाहून शिट्टी वाजवणे, महिलेची ओढणी खेचणे हा विनयभंगाचाच गुन्हा आहे. अशा कृत्यामुळे महिलेच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो, असे निरीक्षण मुंबईतील बोरवली येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी नोंदवले. तर या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. न्यायालयाने आरोपीला एक हजार रुपयांचा दंडही सुनावला आहे. याप्रकरणात एका तपानंतर निकाल लागला हे विशेष.



### बोरिवली न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

निवाड्यामुळे टपोरी आणि रोडमजूनांना दणका बसला आहे. टवाळखोरांना यामुळे जरब बसणार आहे. या निकालामुळे रस्त्यांवरील टपोरींना चांगलाच दणका बसला आहे.

# डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत आणि मुंबई शहर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील मदरसांनी या योजनेंतर्गत सुधारित प्रस्ताव सादर करण्यासाठी विहित अटी व शर्तींची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह पूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करावे असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

अधिक माहिती https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत, याची संबंधित मदरसांनी नोंद घ्यावी. मदरसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक – १४ नोव्हेंबर, २०२५

जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनास प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १५ डिसेंबर, २०२५ आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे अथवा,दूरध्वनी: ०२२-२२६६०१६७, ई-मेल: dpomumbaicity@gmail.com यावर संपर्क साधावा असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# पाचवी सागरी जनगणना १८ डिसेंबरपर्यंत सुरु राहणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** मत्स्यव्यवसाय विभागाने भारतीय कृषी संशोधन परिषद केंद्रीय सागरी मत्स्यिकी संशोधन संस्थेकडून (ICAR-CMFRI) आणि राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पाचवी सागरी जनगणना-2025 ही दि.3 नोव्हेंबर ते दि.18 डिसेंबर 2025 पर्यंत सुरु राहणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संजय पाटील यांनी दिली आहे.

या मत्स्य जनगणनेच्या सर्वेक्षणातून मिळणाऱ्या निष्कर्षातून धोरण निर्मिती, शासकीय योजना तयार करणे व त्यातून मच्छिमार समाजाच्या उपजीविकेचे बळकटीकरण करुन भारताच्या विकासाला नवी चालना व गती देणे असे आहे. या भारत सरकारच्या अभियानास सर्व मच्छिमारांनी सहकार्य करावे, असेही आवाहनही करण्यात आले आहे.

### सहयोग सामाजिक संस्था माध्यमातून

# कल्याण पूर्वेत स्काय वॉकवर स्वच्छता मोहीम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शहर स्वच्छता शहर सौंदर्य बाबत वसा घेतलेल्या तसेच अनेक अभिनव उपक्रम राबिविणार्या सहयोग सामाजिक संस्था कल्याण (पूर्व) यांच्या वतीने शनिवारी कल्याण पूर्वेला जोडणार्या स्काय वॉंकची स्वच्छता करण्यात आली. ही स्वच्छता मोहीम कल्याण स्टेशन (पूर्व) ते सिद्धार्थ नगर व कोळसेवाडीला जोडणाऱ्या स्काय वॉक ची स्वच्छता करून राबवण्यात आली.

सहयोग सामाजिक संस्थेच्या स्त्युत उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून यामुळे स्कायवॉक परिसर स्वच्छ आणि सुशोभित होणार आहे. दररोज हजारो प्रवासी या मार्गाचा वापर करतात, त्यामुळे हा परिसर स्वच्छ राहणे हे सर्वांसाठी अत्यंत गरजेचे आहे. आमदार निधीमधून स्काय वॉक रंगरंगोटी व सुशोभीकरण करून घेणार,असे कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनी याप्रसंगी सांगितले.

केडीएमसी उपायुक्त रामदास कोकरे यांनी यानिमित्ताने सांगितले की, आपल्या स्टेशन परिसरातील स्कायवॉक हे स्वच्छ असलेच पाहिजे आणि या उपक्रमाचे सातत्य राहणे देखील महत्त्वाचे आहे.या पुढे केडीएमसी मार्फत दररोज लक्ष देऊन स्काय वॉक साफसफाई करून घेण्याचे त्यांनी आदेश दिले आहेत.

यापुढे रेल्वे प्रशासन देखील या मोहिमेत सक्रिय सहभाग घेईल. सहयोग सामाजिक संस्था दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी ही मोहीम राबवणार असून, या कार्यात रेल्वे अधिकारी, कल्याण-डोंबिवली महापालिका अधिकारी व सफाई कर्मचारी यांचे सहकार्य अमूल्य ठरणार आहे.असे संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले यांनी याप्रसंगी सांगितले.

तसेच नागरिकांनीसुद्धा या उपक्रमात सहभागी होऊन "स्वच्छ स्टेशन – सुंदर कल्याण" हे ध्येय पूर्ण करण्यासाठी आपले योगदान द्यावे,जे प्रभाग सहायक आयुक्त सविता हिले यांनी लोकांना आवाहन याप्रसंगी केले आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ नेते अण्णा रोकडे, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, रवी देवळे, स्री मुक्ती सामाजिक संघटनेचे वर्षा कळके,संजय देवरे, शाखाप्रमुख सुरेश काळे, वासनकर , देवीचंद अंबादे, उंबरकर, सिलिमकर, रवीदर्शन कराड, रवी हराळे, भारत सताळे, सुनिल डाळिंबे आदीचा सहभाग होता. स्काय वॉंक स्वच्छता मोहीम मध्ये स्काय वॉंकवरील,कचरा ,तसेच चिटकविलेल्या जाहिराती कागद, तसेच पान, तंबाखू खाऊन मारलेल्या ,रंगविलेल्या पिचकर्या ,देखील पाण्याच्या फवार्याने धूवून स्काय वॉंकची स्वच्छता उपस्थितीतांनी केली. आणि समाजापुढे एक अगळा आर्दश स्वच्छता संदर्भात घातला असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते.

# अखिल सेवानिवृत्त शिक्षक संघाची पेण कार्यकारिणी सभा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** अखिल महाराष्ट्र सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या पेण तालुका कार्यकारिणी सभा शिक्षक पतपेढी पेण याठिकाणी आज शनिवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष जगन्नाथ मोकल यांनी सर्वांचे स्वागत केले. मृत झालेल्या सदस्यांना श्रध्दांजली अर्पण केली. अरविंद चव्हाण यांचा वाढदिवस असल्याने संघटनेच्या माध्यमातून पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड व जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचें अभिनंदन करण्यात आले. अरविंद चव्हाण६५ व्या वर्षात पदार्पण केल्याने त्यांचे पेण कार्यकारिणी व जिल्हा सदस्य यांनी केक कापून अभिष्टचिंतन केले.







यावेळी जगन्नाथ मोकल, पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड जिल्हा सरचिटणीस गुरूनाथ पाटील पेण उपाध्यक्षा श्रीमती सीमा सुर्वे श्रीमती अलका मोकल सल्लागार रत्नाकर म्हात्रे यांनी आपले विचार व्यक्त केले .जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील यांनी सेवानिवृत्त शिक्षक बांधवांचे गटविमा, फंड, निवडश्रेणी, विविध बिले याविषयी सखोल चर्चा केली.पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मीला शेंडे मॅडम यांची भेट जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणी सदस्य घेऊन सेवानिवृत्त शिक्षक बांधवांना भेडसावणाऱ्या विविध समस्या व त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.शेवटी पेण तालुका कोषाध्यक्ष प्रदीप म्हात्रे यांनी आभार मानले. ही सभा यशस्वी होण्यासाठी मुरलीधर म्हात्रे, मंगलदास ठाकूर, अलका मोकल, सतिश नवाळे, श्री कडूसर, सविता म्हात्रे, पांडुरंग म्हात्रे, भारती पाटील, आशा म्हात्रे यांनी खूप परिश्रम घेतली.

### उच्चदाब वाहिनीखाली सिडकोचे पार्किंग

# टाटा पॉवरचे 'सेफ्टी नियम' फक्त नागरिकांसाठीच का?

**कायद्याचे उल्लंघन करून सिडको मुख्यालयासमोरील उच्च दाब वाहिनीखालील जागेत रोज हजारो वाहनांची हालचाल, ₹७० लाखांच्या खर्चाची तातडीने चौकशी करा – सजग नागरिक मंचची मागणी**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** सुनियोजित शहर अशी बिरुदावली मिरवणाऱ्या नवी मुंबई शहरातील सार्वजनिक पार्किंग व्यवस्थेचा तुडवडा लक्षात घेत सजग नागरिक मंचाने टाटापॉवरला निवेदन पाठवत शहरातील टाटा पॉवर उच्च दाब वाहिनीखाली पार्किंग व्यवस्था निर्माण करण्यास 'कायदेशीर परवानगी ' देण्याची मागणी केली होती. सदरील निवेदनाला उत्तर देताना टाटा पॉवरने केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा आणि विद्युत पुरवठा) नियम, २०२३ मधील नियम ६२ (१) चा हवाला देत, उच्च दाब वाहिनीखाली कोणतीही रचना किंवा मानवी हालचाल कायद्याने निषिद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे.

उच्च दाब वाहिनीखालील पार्किंग बाबतच्या टाटा पॉवर प्रशासनाच्या दुट्टपी भूमिकेवर मंचाने तीव्र आक्षेप घेतला आहे. उच्च दाब वाहिनीखालील क्षेत्र हे मानवी हालचालीस प्रतिबंधित क्षेत्र हि टाटा पॉवरची भूमिका रास्त असेल तर मग त्याच नवी मुंबई शहरात सिडको मुख्यालय आणि रायगड भवनासमोरील उच्च दाब वाहिनीखाली वर्षानुवर्षे सुरू असलेल्या वाहनतळा बाबत टाटा पॉवर प्रशासनाने आजवर आक्षेप का घेतला नाही ? सदरील पार्किंगला टाटा पॉवर ची संमती आहे का ? असे प्रश्न सजग नागरिक मंचाने उपस्थित केले आहेत

**कायद्यासमोर सर्व समान या लोकशाही तत्वानुसार जर उच्च दाब वाहिनीखालील जागेत पार्किंग व्यवस्था निर्माण करणे महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या नियमानुसार नियमबाह्य ठरत असेल तर टाटा पॉवरने सिडको , रायगड भवन समोरील पार्किंग व्यवस्थेसह नवी मुंबईत उच्च दाब वाहिनीखालील जागा पूर्णतः प्रतिबंधित करावी . ते शक्य नसेल तर नवी मुंबईतील हाय टेन्शन पॉवर लाईन खालील जागेत महानगरपालिकेला सार्वजनिक पार्किंग व्यवस्था सुरु करण्यास रीतसर परवानगी द्यावी. – ॲड . हिमांशू काटकर , सदस्य सजग नागरिक मंच नवी मुंबई .**

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या नियमानुसार उच्च दाब वाहिनीखाली परिसर 'मानवी हालचालीस प्रतिबंधित क्षेत्र' म्हणून कायद्याने वर्गीकृत असेल, तर मग सिडको मुख्यालयासमोरील उच्च दाब वाहिनीखालील परिसरात रोज हजारो वाहनांची हालचाल आणि पार्किंग कशा प्रकारे चालते? या नियमबाह्य कृत्याकडे टाटा पॉवर ने दुर्लक्ष कारण्यामागे सिडको प्रशासनाचा दबाव कारणीभूत आहे का ? याचा जाहीर खुलासा करण्याची मागणी मंचाने केली आहे .

त्याच बरोबर मंचाने सिडकोने उच्च दाब वाहिनीखालील पार्किंगसाठी केलेला ७० लाखांहून अधिक केलेल्या खर्चाच्या बाबतीत कायदेशीर वैधते बाबतचा मुद्दा देखील उपस्थित केला असून, हा पैसा कोणत्या परवानग्या आणि कोणत्या बजेटमधून खर्च झाला, याची सार्वजनिक लेखापरीक्षा (Audit) व्हावी, अशी मागणी केली आहे.

"सामान्य नागरिकांसाठी एक नियम आणि सिडकोसारख्या सरकारी संस्थेसाठी दुसरा नियम, हा दुहेरी मापदंड अस्वीकारार्ह असल्याने " जर ,टाटा पॉवरने या प्रकरणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (MERC) च्या निर्देशानुसार एक तर सिडको मुख्यालयासमोरील व रायगड भवनसमोरील उच्च दाब वाहिनीखालील पार्किंग व्यवस्था तातडीने प्रतिबंधित करावी किंवा ते शक्य नसल्यास नवी मुंबईतील सार्वजनिक पार्किंग समस्या निराकरणासाठी नवी मुंबईतील उच्च दाब वाहिनीखालील जागेवर पार्किंग व्यवस्था सुरु करण्यास परवानगी देत समान कायद्याची अंमलबजावणी न केल्यास, मंचातर्फ टाटा पॉवर व्यवस्थापनाविरुद्ध कायदेशीर नोटीस देऊन न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्याचा स्पष्ट मनोदय मंचाने व्यक्त केलेले आहे ,

मंचाने केलेल्या तक्रारी नंतर टाटा पॉवरने मागील आठवड्यात उच्च दाब खालील सुरक्षारक्षक , वाहनचालकांसाठी सिडकोने बांधलेले निवारा शेड्स निष्काषित केलेले आहेत.

# भिवंडीत श्री कालभैरव जयंतीचा रौप्य महोत्सवी उत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** सालाबादप्रमाणे या वर्षी देखील भिवंडी शहरातील ब्राह्मणआळी पोस्टऑफिस मागे असलेल्या पुरातन श्री कालभैरव मंदिरात "श्री कालभैरव " जयंती निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर व्यवस्थापन समिती कडून करण्यात आले आहे.

भिवंडी शहरातील ब्राह्मणआळी येथे श्री. कालभैरवाचे पुरातन मंदिर आहे. या मंदिराचा २५ वर्षांपूर्वी जीर्णोद्धार झाला आहे. त्या निमित्ताने यावर्षी श्री कालभैरव जयंतीचा रौप्य महोत्सवी उत्सव येत्या गुरुवारी दि.६ नोव्हेंबर पासून सुरु होत आहे. बालयोगी श्री सदानंद



महाराज (तुंगारेश्वर पर्वत, वसई) यांच्या हस्ते ग्रंथ पुजन व दिपपुजन गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वा. होणार आहे. त्यानंतर भाषाप्रभु ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज थोरात (जालना,अंबड) हे संगीतमय श्री शिवमहापुराण कथा सादर करणार आहेत. हि संगीतमय श्री शिवमहापुराण कथा गुरुवार ता. ०६नोव्हेंबर २०२५ ते मंगळवार दि. ११नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ४.३० ते सायंकाळी. ७.३० वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. या दरम्यान सोमवार, दि. १०/११/२०२५- सकाळी ९.०० ते ११.०० वा. रुदाक्ष वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. श्री कालभैरव जयंती निमित्ताने बुधवार ता. १२/११/२०२५ रोजी "शुभसंकल्प" लघुरुद्र अभिषेक सकाळी ७.०० वा. ते ९.०० वाजे दरम्यान होणार आहेत. त्यानंतर सामुहिक पार्थीव शिवलिंग पुजन होणार आहे. तसेच सकाळी ९.०० वा. नगर प्रदक्षिणा पालखी सोहळा आणि भाविकांसाठी दुपारी महाप्रसाद आयोजित केला आहे,अशी माहिती श्री कालभैरव मंदीर सेवा समितीने दिली.

# बेकायदेशीरपणे गाडीवर लोगो लावणे पडणार महागात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** शासनाची मान्यता नसताना बेकायदेशीररित्या काहीजण गाडीला लोगो बसवणे, पोलीस, प्रेस, ॲडव्होकेट स्टीकर लावण्याचे काम करतात. आता लोगो, स्टीकर लावणे महागात पडणार आहे. रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेने याविरोधात कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत ६६ चालकांविरोधात कारवाई करीत ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईने स्टीकर, लोगो लावणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

दुचाकीसह तीन चाकी, चारचाकी व अन्य वाहनांवर स्टीकर, लोगो लावणे चुकीचे आहे. तरीदेखील काही मंडळी वाहनांवर स्टीकर, लोगो लावतात. हा गैरप्रकार टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. पोलीस, पत्रकार, प्रेस, महाराष्ट्र शासन



आदी लोगोलावणाऱ्यांबरोबरच गाडीला आकर्षक चित्र लावणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या

## वाहतूक शाखेची कारवाई सुरु

मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी ही कारवाई सुरु केली आहे. जिल्ह्यात ९० हून अधिक वाहतूक पोलीस तैनात असून, गाडीवर बेकायदेशीर स्टीकर, लोगो दिसल्यास त्यांच्या माध्यमातून कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत ६६ चालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये पोलीस, प्रेस, ॲडव्होकेट यांचा समावेश आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून मान्यता नसतादेखील गाडीवर स्टीकर, लोगो लावणाऱ्यांना दणका देण्यात आला आहे. या मोहिमेतून वाहन चालकांसह मालकांना शिस्त लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# शहापुरात आजपासून त्रिपुरारी पौर्णिमा महोत्सव

### प.पु.सद्गुरू अलोकनाथजी महाराज करणार 'गंगा महायाग'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील प.पु.सद्गुरू रमनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रष्टने 3 नोव्हेंबर ते 5 नोव्हेंबर दरम्यान 290 व्या संजीवन समाधी उत्सवाचे तानसा येथे त्रिपुरारी पौर्णिमा महोत्सवाचे प.पु. सद्गुरू अलोकनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली 'गंगा महायाग'चे आयोजन करण्यात आले आहे. या भक्तिमय सोहळ्याचा आनंद व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष/मठाधिपती प.पु.सद्गुरू अलोकनाथजी महाराज यांनी केले आहे.

त्रिपुरारी पौर्णिमा महोत्सवाच्या 'गंगा महायाग' दरम्यान प्रायश्चित,पश्चाग कर्म,मंडप प्रवेश,मंडप देवता स्थापन, प्रधान देवता अभिषेक,अरणी मंथन अग्नी ,नवग्रहस्थापन हवन,तुलसी विवाह आदी विधिवत पूजा चर्चा करून भक्तिमय कार्यक्रम 3 व 4 नोव्हेंबर ला होणार आहे.हभप शिवाजीराव सातपुते व हभप संदीप महाराज वाघचौरे यांचे संध्याकाळी 7 ते 9 दरम्यान कीर्तन होणार आहे.5 नोव्हेंबर रोजी महापूजन,हवन,उतरांग बलिदान,पूर्णाहुती व महानैवेद्य होईल त्यानंतर दुपारी 1 वाजता भांडुप येथील श्री साईभजन सांस्कृतिक मंडळाचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. संध्याकाळी पौर्णिमा पालखी निघणार असून भाविकांनी यात सहभागी होण्याचे आवाहनअध्यक्ष/मठाधिपती प.पु.सद्गुरू अलोकनाथजी महाराज यांनी केले आहे.




# इराणी टोळीतील सराईत चोराला अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सोनसाखळी चोरीच्या प्रकरणांमध्ये सक्रिय असलेल्या सराईत इराणी टोळीतील एका आरोपीला कल्याण परिमंडळ तीनच्या पोलिसांनी फिल्मी स्टाइलने पकडत बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांची ही धाडसी कारवाई सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

आरोपी जुल्फेकार इराणी याचा पाठलाग करून पोलिसांनी अटक केली. जुल्फेकार हा मुंबईतील विविध




सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी होता. पोलिसांनी सापळा रचून आरोपीचा अर्ध्या किलोमीटरपर्यंत पाठलाग केला आणि शिताफीने त्याला ताब्यात घेतले. जुल्फेकारला पकडण्याच्या प्रयत्नात त्याच्या कुटुंबीयांनीही पोलिसांशी वाद घालण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी संयम राखत आरोपीला अखेर ताब्यात घेतले. आरोपीला पुढील तपासासाठी मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपासादरम्यान मुंबईतील अनेक गुन्ह्यांचे धागेदोरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कल्याण पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024